जा. क्र. ना. बँका/डी-४/आजारी बँका/आढावा/२००७
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक १३-३-२००७

# परिपत्रक

सहकार क्षेत्रात बँकेसारख्या आर्थिक संस्थांमध्ये सभासद, ठेवीदाराचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा सभासदांचे व ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण आणि संगोपन करण्याची जबाबदारी निबंधकाची असते. तसेच बँका व इतर पत सहकारी संस्थांच्या आर्थिक परिस्थितीवरच सहकारी चळवळ आधारलेली आहे आणि म्हणूनच या सहकारी संस्थांकडे लक्ष देणे ही काळाची गरज आहे. सबब सहकारी बँकांबाबत योग्य नियंत्रण ठेवून त्याची वाटचाल योग्यदिशेने व आर्थिक सबलीकरण होण्याच्या मार्गावर कशी होईल यासंबंधी कार्यवाही करणे आवश्यक वाटते. राज्यातील काही नागरी बँकांची परिस्थिती बिकट आहे. अनेक बँका तोट्यात असून बँकांमधील आर्थिक अनियमितता, गैरव्यवहाराचे प्रमाण वाढत आहे. एन.पी.ए.चे वाढते प्रमाणही अनेक बँकांपुढील मोठी समस्या आहे.

नागरी सहकारी बँकांवर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) रिझर्व्ह बँकांकडून राज्यातील नागरी सहकारी बँकांची तपासणी होत असते. या तपासणीच्या आधारे या बँकांचे वर्गीकरण करण्याल येते. रिझर्व्ह बँकेने ग्रेड ३ व ग्रेड ४ वर्गीकरण केलेल्या बँकांची आर्थिक स्थिती नियंत्रणात राहावी व या बँकांचे एन.पी.ए. वसुली प्रभावी पद्धतीने करण्यासाठी बँक ज्याचे अधिकार कक्षेत आहे त्या संबंधीत निबंधकांचे अध्यक्षतेखाली जिल्हा विशेष लेखापरीक्षक आणि संबंधीत मुख्यालयातील उपनिबंधक/सहाय्यक निबंधक याचा समावेश असलेली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात यावी. ही समिती एन.पी.ए. वसुली व इतर बाबीसाठी दर तिमाही आढावा घेऊन त्याचा अहवाल सोबतच्या ''अ'' नमुन्यात या कार्यालयास सादर करील.

विभागातील अधिनस्त बँकांपैकी ज्या बँकांवर रिझर्व्ह बँकेने निर्देश जारी केले आहेत अथवा ज्या बँकांची आर्थिक स्थिती सुधारण्यापलिकडे गेलेली आहे, अशा बँकांच्या ठेवीदारांच्या हिताचे दृष्टीने अन्य सक्षम बँकेमध्ये विलीनीकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. अशा प्रत्येक बँकेची आर्थिक स्थिती तपासून अन्य बँकांमध्ये विलीनीकरण करण्याची शक्यता सक्षम बँकेबरोबर चर्चा करून त्याबाबतचा अहवाल स्वतंत्रपणे सादर करावा. अशा बँकांच्या विलीनीकरणासाठी समन्वयक म्हणून पुढील अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| विभाग | समन्वयक अधिकारी |
|---|---|
| १) पूणे व कोल्हापूर विभाग | सहनिबंधक (ना. बँका) मुख्यालय, पुणे |
| २) मुंबई व कोकण विभाग | उपनिबंधक (ना. बँका) मुख्यालय, पुणे |
| ३) नासिक व औरंगाबाद विभाग | मा. आयुक्त यांचे खाजगी सचिव, पुणे |
| ४) नागपूर, अमरावती व लातूर विभाग | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा |

२) नागरी सहकारी बँकांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३/८८ अन्वये चौकशी सुरु आहे. अशा चौकशी बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. अशाच एका प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असल्यामुळे या प्रकरणी गांभिर्याने कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे. सर्व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व चौकशी अधिकाऱ्यांची दर तिमाही आढावा सभा घेऊन चौकशीची सद्यस्थितीचा अहवाल या कार्यालयास सोबत जोडलेल्या ''ब'' नमुन्यात सादर करावा.

३) राज्यातील सुमारे ५० नागरी सहकारी बँका अवसायनात असून अवसायनाचे कामकाज जलदगतीने होणे आवश्यक आहे. दिनांक २४-१-२००७ रोजी झालेल्या TAFCUB च्या बैठकीत हा मुद्दा चर्चेस आला होता आणि सहकार खात्याने या प्रकरणी गांभिर्याने कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत प्रदर्शित करण्यात आले. नागरी सहकारी बँक अवसायनात गेल्यानंतर ठेवीदारांचे ठेवीबाबतचे क्लेम लवकरात लवकर निकाली काढण्याचे दृष्टीने DICGC कडे तातडीने पाठवून त्याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन कामाच्या कार्यबाहुल्यामुळे या कामाकडे दुर्लक्ष करणे अक्षम्य ठरेल. याची कृपया नोंद अवसायक याने द्यावी. सर्व विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व अवसायकांची दर तिमाही आढावा सभा घेऊन अवसायनाच्या प्रगतीचा सद्यस्थितीचा अहवाल या कार्यालयास सोबत जोडलेल्या '' क'' नमुन्यात सादर करावा.

वर नमूद केलेल्या सर्व सभा एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी महिन्याच्या किमान तिसऱ्या आठवड्यापर्यंत घेऊन त्याबाबतचा अहवाल संबंधीत महिन्याच्या अखेरीस या कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घेण्यात यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति, १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) २) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण) (सर्व) ३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) ४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

## नमुना 'अ'

१) बँकेचे नाव
२) कार्यक्षेत्र
३) आर.बी.आय. ग्रेड
४) आर. बी. आय. ने निर्बंध घातले असल्यास त्याचे स्वरुप
५) बँकेवर चालू असलेल्या वैधानिक कार्यवाहीचा तपशील..... प्रशासक...... का. क. ८३.८८ चौकशी :
६) आर्थिक स्थिती : (आकडे लाखात)

| तपशील | दि. ३१-३-२००७ | दि. ३०-६-२००७ | वाढ/घट (+)(-) |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | | | |
| संशयीत व बुडीत निधी | | | |
| इतर निधी | | | |
| ठेवी | | | |
| घेतलेली कर्जे | | | |
| दिलेले कर्जे | | | |
| ढोबळ एन.पी.ए. % | | | |
| नक्त एन.पी.ए.% | | | |
| नफा/तोटा | | | |
| सी.आर.ए.आर.% | | | |
| ठेवींचे अपरक्षण% | | | |

बँकेच्या तोट्याची कारणे जसे आर्थिक घोटाळा एन.पी.ए. आदी तपशील द्यावा व त्यामधील प्रगती अहवाल द्यावा.

## नमुना 'ब'

१) बँकेचे नाव

२) कार्यक्षेत्र

३) चौकशी कलम ८३/८८

४) चौकशी आदेश दिनांक

५) चौकशी अधिकाऱ्याचे नाव

६) चौकशीची सद्यस्थिती

७) न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास सद्यस्थिती

८) चौकशी विहीत मुदतीत पूर्ण झाली नसल्यास कारणे

९) चौकशी पूर्ण होण्यासाठी अपेक्षित कालावधीचा दिनांक

## नमुना ''क''

१) बँकेचे नाव

२) कार्यक्षेत्र

३) अवसायन आदेश दिनांक

४) अवसायक अधिकाऱ्याचे नाव

५) अवसायनाची सद्यस्थिती

अ) ठेवीदारांचे कलम DICGC यांचेकडून प्राप्त करून वाटप करणे

ब) येणे कर्जाची वसुली

क) कर्मचाऱ्यांची देणी व इतर देणी

ड) मालमत्तेची विक्री करणे

इ) विलीनीकरणाबाबतची शक्यता

६) न्यायालयीन प्रकरणे प्रमाणित असल्यास सद्यस्थिती

७) अवसायानाच्या येणे देणे रकमांबाबत तपशील

८) अवसायनाचे कामकाज विहीत मुदतीत पूर्ण झाली नसल्यास कारण

९) अवसायन पूर्ण होण्यासाठी अपेक्षित कालावधी

राज्यातील नागरी सहकारी बँका व
सहकारी पतसंस्थांमधील गैरव्यवहारास
जबाबदार असणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक, युआरबी-१८०८/प्र.क्र. १७/७-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २७-२-२००८

वाचा :

१) शासन पत्र (गृह विभाग) क्रमांक : सीआरएम-२००७/पोल-११, दि. २७-११-२००७

२) शासन परिपत्रक (गृह विभाग) क्रमांक : सीआयआय-०१०८/प्र.क्र. ११/पोल-१२, दि. १४-१-२००८

प्रस्तावना :

राज्यातील नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्थांमध्ये सामान्य ठेवीदारांच्या ठेवी आहेत. काही संस्थांच्या गैरव्यवस्थापन व गैरव्यवहारामुळे ठेवीदारांना त्यांच्या ठेवी परत मिळत नसून त्यासाठी राज्यभर जनआंदोलन सुरु झाले आहे. ठेवी परत देण्याच्या अनुषंगाने या विभागाकडून केलेल्या कार्यवाहीत अशा नागरी सहकारी बँका/सहकारी पतसंस्थांमधील वसुली अधिकारी यांच्या वसुली कार्यवाहीत विविध कर्जदार संघटना व शेतकरी संघटनांमुळे अडचणी निर्माण होत आहेत. तसेच अशा वसुली अधिकाऱ्यांना वसुली वेळी संरक्षण नसल्यामुळे कर्ज वसुली परिणामकारक होत नाही. कर्जदाराच्या स्थावर मालमत्तेची जप्ती/लिलाव लावतांनाही पोलीस संरक्षण मिळत नाही. त्याचप्रमाणे राज्यातील गैरव्यवहारात अडकलेल्या नागरी सहकारी बँका/सहकारी पतसंस्थांच्या दोषी संचालकांवर गुन्हा दाखल करुन घेण्याकामी बहुतांश ठिकाणी पोलीस विभागाचे सहकार्य मिळत नसल्याचे व पोलीस विभागाकडून दोषी संचालक/कर्जदार यांना अटक करण्याबाबत पुढील कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आल्याने शासनाच्या गृह विभागाकडून परिपत्रक क्रमांक : सीआयआय-०१०८/प्र.क्र. ११/पोल-१२, दि. १४-१-२००८ अन्वये आवश्यक ते आदेश सर्व संबंधितांना देण्यात आलेले आहेत.

तसेच नागरी सहकारी बँका/सहकारी पतसंस्थांमधील, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या नागरीकांना न्याय मिळत नसल्याचे आणि नियमित कर्ज परतफेड न करणाऱ्या/कर्ज बुडविणाऱ्या नागरीकांवर/संचालक मंडळावर कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आल्याने शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

# परिपत्रक

१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील नागरी सहकारी बँका व सहकारी पतसंस्थामधील, ज्या कर्जदार सभासदांची कर्ज परतफेड करण्याची क्षमता आहे, परंतु थकबाकीदार आहेत अशा व्यक्तींची यादी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा उपनिबधंक, सहकारी संस्था यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने यादी तयार करावी.

२) सदर वसुली याद्या तयार करुन त्याप्रमाणे वसुली सप्ताह/पंधरवडा राबवून बुडीत कर्जाची अधिकाधिक वसुली करावी.

३) नियमित कर्ज परतफेड न करणाऱ्या/कर्ज बुडविणाऱ्या नागरीकांवर/संचालक मंडळावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार प्राधान्याने कारवाई करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(बी. एस. यमपल्ले)
विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

प्रति,

१) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
३) अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
४) श्री. रत्नाकर गायकवाड, महानगर आयुक्त, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, मुंबई
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) सर्व जिल्हाधिकारी
७) अप्पर निबंधक, सहकारी संस्था (तपासणी व निवडणूक), सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, पुणे
८) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था
९) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
१०) निवड नस्ती

प्रत माहितीस्तव :

१) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
३) मा. प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहायक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

जा.क्र. : ना.बँका/डी-४/बँक-पत/कर्ज/खवि/०८
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक ४ मार्च २००८

# सुधारीत परिपत्रक

**विषय : नागरी सहकारी पतसंस्थांनी कर्ज मालमत्तेची खरेदी-विक्री करणेबाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दिनांक २२ जानेवारी २००८**

संदर्भीय परित्रिकान्वये अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांना रोखता-तरलता निर्माण करण्याच्या उद्देशाने आपल्याकडील कर्जखाती सक्षम पतसंस्थेस विकण्यास आणि सक्षम पतसंस्थेने अशी कर्ज खाती खरेदी करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. उक्त परिपत्रकात सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे अट होती.

१) सदर योजने अंतर्गत लेखापरीक्षण वर्ग अ प्राप्त असलेली सहकारी पतसंस्थांच अडचणीतील पतसंस्थांची कर्जे खरेदी करु शकेल.

२) असा व्यवहार होताना संबंधीत कर्ज खाती अकार्यक्षम असेल तर खरेदी करणाऱ्या संस्थेच्या पुस्तकात ते खरेदी तारखेपासून एक वर्ष कार्यक्षम म्हणूनच मानण्यात येईल. मात्र एक वर्षानंतर सदरच्या कर्ज खात्यास एन.पी.ए. च्या तरतुदी लागू होतील.

आता त्यामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

१) सदर योजनेअंतर्गत अ आणि ब लेखापरीक्षण वर्ग प्राप्त असलेली सहकारी पतसंस्थांच अडचणीतील पतसंस्थांची कर्जे खरेदी करु शकेल.

२) असा व्यवहार होताना संबंधीत कर्ज खाती अकार्यक्षम असेल तर खरेदी करणाऱ्या संस्थेच्या पुस्तकात ते खरेदी तारखेपासून तीन वर्ष कार्यक्षम म्हणूनच मानण्यात येईल. मात्र तीन वर्षानंतर सदरच्या कर्ज खात्यास एन.पी.ए. च्या तरतुदी लागू होतील.

वरीलप्रमाणे बदल सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
४) तालुका उप/सहायक निबंधक सहकारी संस्था (सर्व)

जा.क्र.ना.बँका/डी-४/पतसंस्था/समिती नियुक्ती/२००८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-यांचे कार्यालय
दिनांक - ४ ऑगस्ट २००८

**विषय : अडचणीतील नागरी सहकारी बँका/नागरी सहकारी पतसंस्थांबाबतची सद्यस्थिती विचारात घेता भविष्यकाळात अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करणेकामी समिती नेमणेबाबत .....**

उपरोक्त विषयास अनुसरुन दि. २-८-२००८ रोजी मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे अध्यक्षतेखाली सहकार आयुक्त कार्यालयातील सभागृहात आढावा सभा घेण्यात आली. सदर सभेमध्ये मा. प्रधान सचिव यांनी सूचित केल्यानुसार खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. एम.बी. त्रिभुवन | अध्यक्ष | अपर निबंधक सहकारी संस्था (त.वनि.) म.रा.पुणे |
| २) | श्री. डि.एल.ओऊळकर | सदस्य | सहसंचालक(पणन) म.रा.पुणे |
| ३) | श्री. शैलेश कोतमिरे, | सचिव | सहसंचालक, (पणन) म.रा.पुणे-तथा प्र. उपनिबंधक, (ना.बँ. २) म.रा. पुणे |
| ४) | श्री. डॉ. अे. बी. जोगदंड | सदस्य | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर |
| ५) | श्री. डॉ. तोष्णिवाल, | सदस्य | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे |
| ६) | श्री. प्रकाश अष्टेकर | सदस्य | उपनिबंधक (ना.बँका) म.रा.पुणे |
| ७) | श्री. श्रीकृष्ण वाडेकर | सदस्य | उपनिबंधक (अर्थ) म.रा.पुणे |
| ८) | श्री. रामेंद्र जोशी, | सदस्य | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे |
| ९) | श्री. के. एन. जाधव, | सदस्य | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा |
| १०) | श्री. आनंद कटके, | सदस्य | सहाय्यक निबंधक, सह. संस्था, वडगांवमावळ जि. पुणे |
| ११) | श्री. कडू | सदस्य | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जळगाव अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव |
| १२) | श्री. कंडारे, | सदस्य | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, |
| १३) | श्री. भामरे | सदस्य | सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था, धुळे |
| १४) | श्री. चंद्रशेखर बारी, | सदस्य | सहाय्यक निबंधक, सह. संस्था, कोपरगाव जि. अहमदनगर |
| १५) | श्री. ए. पी. काकडे | सदस्य | उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर |
| १६) | श्री. दिनेश चंदेल | सदस्य | उपनिबंधक, परसेवा एम.सी.डी.सी.पुणे |

सदर समितीने खालीलप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

या कार्यालयाकडून/शासनाकडून निर्गमित करण्यात आलेली परिपत्रके व पतसंस्थांच्या नियंत्रणासाठी देण्यात आलेल्या सूचना याबाबत एक मास्टर सुर्क्युलर तयार करणे. त्यामध्ये पतसंस्थांच्या नोंदणीबाबत कामकाज करताना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे कलम ३५ अन्वये बाहेरील कर्जउभारणी

मर्यादेबाबत तसेच पतसंस्थांकडून घेण्यात आलेल्या नाममात्र सभासदत्वाबाबत, संस्थेचे कार्यक्षेत्र वाढविण्याबाबत, कर्जमर्यादा निश्चित करणेबाबत, पतसंस्थेशी फक्त सभासदांनीच व्यवहार करणेबाबत, सभासदांकडूनच ठेवी स्विकारणे, पतसंस्थांवर आर्थिक निर्बंध (मोनोटोरिअम) टाकणे, त्यासाठी सदर पतसंस्थांवर दंड दंडात्मक कारवाई करणे, सदर पतसंस्थांवर फौजदारी कारवाई करणे, लेखापरीक्षण करुन घेणे, यासाठी आवश्यकता भासल्यास सदरचा बदल कायद्यात रुपांतरीत करणे, त्यानुसार परिपत्रकीय सूचनांमध्ये देखील बदल करणे इ. बाबींचा समावेश करावयाचा आहे.

तसेच पतसंस्थांमध्ये मुख्य पदावर कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत विहीत निकष ठरविणे, सदर पतसंस्थांचे लेखापरिक्षणाबाबतचे निकष निश्चित करणे, तसेच सहकार खात्यातील तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरणेबाबत कार्यवाही करणे इ. बाबी देखील विचारात घ्यावयाच्या आहेत.

सदर नियुक्तीनुसार चर्चा करण्याकरिता प्राथमिक सभा दिनांक ८-८-२००८ रोजी सकाळी १०.०० वाजता मा.सहकार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली सहकार आयुक्त कार्यालयात सभा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस उपस्थित रहावे.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे करिता**

प्रति,

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. एम. बी. त्रिभुवन | अपर निबंधक सहकारी संस्था (त.वनि.) म.रा.पुणे |
| २) | श्री. डि.एल.ओऊळकर | सहसंचालक (पणन) म.रा. पुणे |
| ३) | श्री. शैलेश कोलमिरे, | सहसंचालक,(पणन) म.रा. पुणे-तथा प्र. उपनिबंधक,(ना.बँ.२)म.रा.पुणे |
| ४) | श्री. डॉ. अे. बी. जोगदंड | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर |
| ५) | श्री. डॉ. तोष्णिवाल | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे |
| ६) | श्री. प्रकाश अष्टेकर | उपनिबंधक (ना.बँका) म.रा.पुणे |
| ७) | श्री. श्रीकृष्ण वाडेकर | उपनिबंधक(अर्थ) म.रा.पुणे |
| ८) | श्री. रामेंद्र जोशी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,धुळे |
| ९) | श्री. के.एन. जाधव | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,सातारा |
| १०) | श्री. आनंद कटके, | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडगावमावळ जि. पुणे |
| ११) | श्री. कडू | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,जळगाव अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगाव |
| १२) | श्री. कंडारे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, |
| १३) | श्री. भामरे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,धुळे |
| १४) | श्री. चंद्रशेखर बारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,कोपरगाव जि. अहमदनगर |
| १५) | श्री. ए. पी. काकडे | उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर शहर |
| १६) | श्री. दिनेश चंदेल | उपनिबंधक, परसेवा एम.सी.डी.सी. पुणे |

**प्रत : मा. प्रधान सचिव,(सहकार व पणन) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.**

जा.क्र.ना.बँका/डी-४/पतसंस्था/मॅचिंग/सूचना/२००८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था.
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक : १७-१०-२००८

प्रति,
विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था
(सर्व)

**विषय : अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांमधील Matching ने होणाऱ्या कर्ज वसुलीबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

अडचणीतील पतसंस्थांमधील कर्जवसुलीचे अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. आण्णा हजारे यांचे समवेत राज्यस्तरीय कृती समितीच्या दि. ५-११-२००७ व दि. ३०-११-२००७ च्या सभेत सविस्तर चर्चा झालेली आहेच. याबाबत मा. आण्णा हजारे यांनीही Matching करताना ३०% रोख व ७०% ठेव पावत्या या प्रमाणातच Matching करण्याबाबत अनुमती दिलेली होती. सदर Matching मध्ये गैरप्रकार होत असल्याबाबत अनेक ठेवीदार व ठेवीदार प्रतिनिधींनी राज्यस्तरीय कृती समितीच्या सभेत निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यामुळे Matching चे व्यवहार करताना जे आवश्यक ती खात्री करूनच करण्याबाबत निर्देश दिलेले होते.

याबाबत मा. आण्णा हजारे यांचेशी दि. ११-९-२००८ रोजी राळेगणसिद्धी येथे झालेल्या चर्चेच्या वेळीही मा. आण्णा हजारे यांनी सदर Matching च्या व्यवहारात गैरप्रकार होत असल्याबाबत त्यांचेकडे तक्रारी प्राप्त होत असून त्यानुषंगाने असे व्यवहार करताना ज्या ठेवीदारांच्या ठेव पावत्यांचे Matching करावयाचे आहे त्यांचेकडून रु. १००/- च्या स्टँप पेपरवर संबंधित ठेवीदारांचे हमीपत्र घेण्याबाबत व तो स्वखुशीने सदर ठेव पावत्या कर्जदारास त्यांचे कर्ज खात्यावर वर्ग करण्यासाठी देत असल्याचे व सदर ठेव पावत्यांचे सर्व पैसे त्याला कर्जदाराकडून मिळालेले असून याबाबत त्याची कोणतीही तक्रार नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १००/- च्या स्टँप पेपरवर घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

त्यानुषंगाने कळविण्यात येते की, अडचणीतील पतसंस्थेमध्ये Matching चे व्यवहार करताना अशाप्रकारे ठेवीदाराचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर लेखीपत्र घेऊनच Matching चे व्यवहार करण्याबाबतची दक्षता घ्यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

जा. क्र. ना. बँक/डी-४/समिती/कायदेतील बदल/२००८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
दिनांक : १७-११-२००८

**विषय : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविणेकामी समिती नियुक्त करणेबाबत ....**

उपरोक्त विषयांचे कृपया अवलोकन व्हावे.

सद्यस्थितीत अडचणीतील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांतील ठेवी परत मिळणे कामी आंदोलन मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्या अनुषंगाने सभासदाच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये, अधिकार, सहकारी संस्थेतील गैरव्यवहारास जबाबदार, पदाधिकारी, अधिकारी यांचेवर कार्यवाही, कर्जदारावर वसुलीचे अनुषंगाने कार्यवाही, व्यवहारातील पारदर्शकपणा, कर्ज वसुली तात्काळ होण्याच्या वगैरे बाबींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदींमध्ये सद्यस्थितीतील बदल विचारात घेवून सुधारणा करणे आवश्यक झालेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मध्ये करावयाच्या आवश्यक सुधारणा शासनास सुचविणे कामी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. किशोर तोष्णीवाल, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | अध्यक्ष |
| २) | डॉ. आनंद जोगदंड, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | सदस्य |
| ३) | श्री. विद्याधर अनासकर, अध्यक्ष, विद्या सहकारी बँक लि. | सदस्य |
| ४) | श्री. सुनिल देशमुख, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | सदस्य |
| ५) | श्री. धनंजय डोईफोडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | सदस्य |
| ६) | श्री. काका कोयटे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेड. | सदस्य |
| ७) | श्री. डी. टी. भापकर, विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे | सदस्य, सचिव |

सदर समितीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचवून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ या कार्यालयास अवगत करावा.

स्थळ प्रतिवर मा. सहकार आयुक्त यांची सही असे.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता**

प्रति, : १) डॉ. किशोर तोष्णीवाल, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे २) डॉ. आनंद जोगदंड, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर ३) श्री. विद्याधर अनासकर, अध्यक्ष विद्या सहकारी बँक लि. ४) श्री. सुनिल देशमुख, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ५) श्री. धनंजय डोईफोडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर ६) श्री. डी. टी. भापकर, विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे ७) श्री. काका कायटे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेड ८) मा. सहकार आयुक्त यांचे स्वीय सचिव.

प्रत माहितीस्तव :

१) मा. प्रधान सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

जा. क्र. ना. बँका/डी-४/रापडफेड/चर्चा/सूचना/०८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य १, पुणे यांचे कार्यालय
दिनांक : १७-११-२००८

# परिपत्रक

## विषय : तरलता संपुष्टात आल्यामुळे अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांना ठेवी परत करण्यावर निर्बंध घालणे बाबत.

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, सद्यस्थितीत अनेक पतसंस्था या तरलता संपुष्टात आल्यामुळे ठेवी परत करू शकत नाहीत. किंबहुना अनेक नागरी सहकारी पतसंस्था या ठेवीदारांनी मोठ्या प्रमाणात ठेवी काढल्याने व त्यामुळे संस्थेची तरलता संपुष्टात आल्यामुळे आर्थिक अडचणीत आलेल्या आहेत. सदर बाबत अशा अडचणीतील संस्थांना त्यांच्या ठेवी परत करण्यासाठी रिझर्व्ह बँक ज्याप्रमाणे बँकांना ठेवी परत करण्यावर निर्बंध लागू करते त्याप्रमाणे पतसंस्थांनाही असे निर्बंध लागू करण्याबाबत विविध पतसंस्था व पतसंस्था फेडरेशन यांनी मागणी केलेली आहे. ही बाब विचारात घेऊन खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ मधील तरतुदीनुसार निबंधक अशाप्रकारचे निर्देश देऊ शकतो तथापि असे सरसकट निर्बंध आणल्यास त्याचा विपरीत परिणामही पतसंस्थांवर होऊ शकतो ही बाब विचारात घेवून अशा अडचणीतील संस्थेने संबंधीत निबंधक यांचेकडे प्रस्ताव दिल्यास निबंधक त्याचे वरिष्ठ निबंधकास म्हणजे संस्था तालुका कार्यक्षेत्रातील असल्यास जिल्हा उपनिबंधक, जिल्हा स्तरावरील असल्यास विभागीय सहनिबंधक व विभागीय स्तरावरील असल्यास सहकार आयुक्त कार्यालयाकडे व सहकार आयुक्त स्तरावरील संस्था असल्यास राज्य शासनास सादर करील.

२) अशाप्रकारे निर्बंध लादण्यासाठी संबंधीत कार्यालयाचे स्तरावर एक कमिटी असेल. सदर कमिटीमध्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था हे अध्यक्ष पतसंस्था फेडरेशनचा प्रतिनिधी, सहाय्यक निबंधक व विशेष लेखापरीक्षक हे सदस्य असतील. सदर समिती गुणवत्तेवर निर्णय घेईल व समितीच्या शिफारशीनुसार संबंधीत निबंधकांनी पुढील कार्यवाही करावी.

३) संस्था विभाग व राज्यस्तरावरील असल्यास अशा संस्थेचे मुख्यालय ज्या जिल्ह्याचे ठिकाणी आहे त्या जिल्ह्याचे स्तरावरील समिती आवश्यकतेनुसार याबाबत सविस्तर प्रस्ताव त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी संबंधीत निबंधकास सादर करील.

४) वरीलप्रमाणे उपाययोजना हा सद्या अडचणीतील असलेल्या पतसंस्थांना लागू राहणार नाही. जी नागरी ग्रामीण बिगरशेती पतसंस्था ठेवीदार ठेवी काढीत असल्याने तरलता संपुष्टात येऊन अडचणीत येण्याची शक्यता आहे अशा पतसंस्थांना वरील उपाययोजना लागू राहील.

तरी त्यानुषंगाने आपले स्तरावर वरीलप्रमाणे समिती गठीत करून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रति, १) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व) २) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व) ३) तालुका निबंधक सहकारी संस्था (सर्व) ४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे ५) जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन (सर्व)

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/स्वनिधी/२००८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : ११ डिसेंबर २००८

# परिपत्रक

राज्यामध्ये सुमारे १८,६२८ नागरी सहकारी पतसंस्था असून त्यापैकी ४६२ नागरी सहकारी पतसंस्था या आर्थिक अडचणीत आल्याचे निदर्शनास आलेले आहे. अडचणीत आलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांची आर्थिक स्थिती विचारात घेता त्यापैकी अनेक पतसंस्था या त्यांची तरलता संपुष्टात आल्यामुळे आर्थिक अडचणीत येऊन ठेवीदारांच्या ठेवी परत करु शकलेल्या नाहीत.

राज्यातील पतसंस्था अडचणीत येण्याची कारणे विचारात घेता, अनेक पतसंस्थांनी त्यांचे स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी स्विकारलेल्या असल्याने व संस्थांचे स्वनिधी कमी असल्याने संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत ठरुन संस्था अडचणीत येण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. मात्र संबंधीत निबंधक आणि लेखापरीक्षक यांनी सदर बाब ही गांभीर्याने घेतलेली नाही याबाबत मा. प्रधान सचिव यांनी तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ मध्ये मर्यादित जबाबदारी असलेल्या संस्थांनी कर्ज काढण्याच्या बाबतीतील शर्ती नमूद केलेल्या असून, नियम ३६ व ३७ यात उल्लेखिलेल्या संस्थांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मर्यादित जबाबदारी असलेल्या संस्थेने रजिस्ट्रारची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय आपले भरणा केलेले शेअर्स भांडवल, संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोट्याच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण १० पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्कारता कामा नये अशा प्रकारची स्पष्ट तरतूद आहे. त्यानुसार नागरी पतसंस्थांना त्यांचे स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी स्विकारता येणार नाहीत. तसेच नागरी सहकारी पतसंस्थांना लागू केलेल्या आदर्श उपविधीमध्ये देखील या बाबीचा समावेश आहे. पतसंस्थांना अधिक रकमेची जबाबदारी स्विकारावयाची असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार त्यांनी त्यास संबंधीत निबंधकांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत अनेक पतसंस्थांनी निबंधकांची मंजुरी न घेता, जास्त रकमेची जबाबदारी स्विकारुन नियम ३५ चे सरसकट उल्लंघन केलेले आहे. अधिक रकमेची जबाबदारी स्विकारताना त्या प्रमाणात स्वनिधीची उभारणी केलेली नसल्यामुळे संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत ठरुन आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे. अशा संस्थांवर तात्काळ कार्यवाही केल्यास त्या पतसंस्था आर्थिक अडचणीत येऊन त्यांचे विपरीत परिणाम सहकार चळवळीवर होणार असल्यामुळे अशा संस्थांना त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने त्यांच्या स्वनिधीत वाढ करण्यास कालमर्यादा ठरवून देणे व अशा संस्थांवर काही बंधने घालणे आवश्यक असल्याने याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) राज्यातील ज्या पतसंस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ मधील तरतुदीचे उल्लंघन करुन स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेची जबाबदारी स्विकारलेली आहे अशा पतसंस्थांनी या आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांमध्ये त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीच्या प्रमाणात त्यांचा स्वनिधी कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या एकूण ठेवींच्या १०% पर्यंत वाढवावा.

२) अशा पतसंस्थांना नियम ३५ अन्वये तरतुदीचे पालन होईपर्यंत लाभांश वाटप करता येणार नाही.

३) अशा संस्थांनी नवीन ठेवी स्विकारताना त्या फक्त ७% पेक्षा कमी व्याजदराच्याच (Low Cost) ठेवी स्विकाराव्यात. अशा संथांना सदर व्याजदरापेक्षा जास्त व्याजदराच्या ठेवी स्विकारता येणार नाहीत.

४) अशा संस्थांना नवीन शाखाविस्तार करता येणार नाही.

५) संबंधीत तालुका सहाय्यक/उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक व विभागीय सहनिबंधक यांनी त्यांचे अधिकार कक्षेत कार्यरत असलेल्या सर्व पतसंस्थांची संस्थानिहाय तपासणी/माहिती घेऊन (राज्यस्तरीय पतसंस्थांसह) ज्या पतसंस्थांनी नियम ३५ चे उल्लंघन करून अधिक रकमेची जबाबदारी स्विकारलेली आहे अशा पतसंस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये निर्देश देऊन अशा संस्थांचा तीन वर्षाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्यानुषंगाने पाठपुरावा करून कोणत्याही परिस्थितीत विहीत कालमर्यादेत नियम ३५ मधील तरतुदीचे पालन होईल असे पहावे. अशा तयार केलेल्या संस्था निहाय कालबद्ध कार्यक्रमाची नोंदवही संबंधीत निबंधकांनी त्यांचे कार्यालयात ठेवावी व दरमहा अशा पतसंस्थांच्या सभेमध्ये याचा आढावा घ्यावा.

६) संबंधीत निबंधक यांनी अशा पतसंस्थांचा स्वनिधी वाढविण्याचे अनुषंगाने खालील बाबी संस्थानिहाय कालबद्ध कार्यक्रम तयार करताना विचारात घ्याव्यात.

प्रथमत: संस्थेस स्वनिधी किती रकमेने वाढविणे आवश्यक आहे हे निश्चित करावे व त्यानुषंगाने....

a) संस्थेचे वसूल भाग भांडवल वाढविणे

b) संस्थेचा नफा वाढविणे, (त्यासाठी संस्थेचा सी डी रेशो ६०% ते ७०% या दरम्यान राहील या अनुषंगाने नियोजन करणे, संस्थेची थकबाकी विचारात घेऊन वसुलीचे नियोजन करणे, संस्थेचे इतर उत्पन्न वाढविणे, संस्थेने केलेल्या गुंतवणुकीचे योग्य व्यवस्थापन करणे वगैरे)

c) संस्थेचा प्रशासकीय खर्च हा कोणत्याही परिस्थितीत खेळत्या भांडवलाच्या २% पेक्षा अधिक होणार नाही या बाबतची दक्षता घेणे.

d) अनावश्यक खर्च, जाहिरात खर्च, सभा समारंभ खर्च पूर्णत: नियंत्रित करणे.

e) सतत तीन वर्षे तोट्यामध्ये असलेल्या शाखा जवळील शाखेत विलिन करणे.

७) सदर कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसांचे आत तयार करून त्याची अंमलबजावणी सुरु करावयाची आहे.

८) संबंधीत लेखापरीक्षक यांनी संस्थेचे लेखापरीक्षण करताना संस्थेस दिलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार संस्थेने स्वनिधी वाढविण्यासाठी केलेल्या व करीत असलेल्या उपाययोजनाबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट शेरे नमूद करावेत.

९) अशा पतसंस्थांना ठरवून दिलेल्या विहीत कालमर्यादेत पतसंस्थांनी त्याच्या स्वनिधीत वाढ केलेली नसेल व संस्था नियम ३५ चे उल्लंघन करीत असेल तर सदर संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

संबंधीत निबंधक/लेखापरीक्षक यांनी त्यांचे विभाग, जिल्हा, तालुक्यामध्ये वरीलप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे. या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधीताची राहील याचीही नोंद घ्यावी.

परीपत्रकीय सूचनेप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे किंवा नियम ३५ चे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतरही ज्या निबंधक/लेखापरीक्षक यांनी या बाबींकडे दुर्लक्ष केलेले आहे असे निदर्शनास आल्यास संबंधीत निबंधक/लेखापरीक्षकांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार पुढील शिरस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल याबाबत त्यांनी गंभीरपणे नोंद घ्यावी.

स्थळ प्रतिवर मा. सहकार आयुक्त यांची सही असे.

सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे करिता

प्रत –

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

३) तालुका उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)

४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन पुणे

५) जिल्हा पतसंस्था फेडरेशन.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/ठेवीकर्ज/मॅचिंग/०९
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : २६ फेब्रुवारी २००९

# परिपत्रक

राज्यातील अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांमधील सामान्य ठेवीदारांच्या ठेवी काही संस्थांच्या गैरव्यवस्थापन व गैरव्यवहारामुळे परत मिळत नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर ठेवी परत करण्याचे अनुषंगाने मागील सुमारे दोन वर्षांपासून सहकार विभागाने कार्यवाही सुरू केलेली असून त्या अनुषंगाने तात्काळ कर्ज वसुलीसाठी ठेवी व कर्जाचे मॅचिंग करताना ३०% रोख स्वरुपात व ७०% ठेव पावतीच्या स्वरुपात मॅचिंग करण्याबाबत यापूर्वी निर्णय घेण्यात आलेला होता.

तथापि मॅचिंग व्यवहारामध्ये अनेक गैरप्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने ठेवी व कर्जाचे मॅचिंगबाबतचा निर्णय रद्द करण्यात येत असून सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/तालुका निबंधक यांना कळविण्यात येते की, यापुढे अशाप्रकारे मॅचिंगचे व्यवहार न करता कर्जवसुली ही रोख स्वरुपात होईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदर बाब सर्व अडचणीतील पतसंस्थांचे निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे.

मा. सहकार आयुक्त यांचे मान्यतेने

अपर निबंधक, सहकारी संस्था
(तपासणी व निवडणुका) महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत,
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पुणे

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/ठेवीकर्ज/मॅचिंग/८०७/२००९
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : १६ मे २००९

# परिपत्रक

**विषय : अडचणीतील पतसंस्थांमधील कर्ज वसुलीचे अनुषंगाने Matching चे व्यवहार करण्यास मंजुरी मिळणेबाबत.**

**संदर्भ : १) राज्यस्तरीय कृती समितीच्या दि. ५-११-२००७ व दि. ३०-११-२००७ च्या सभेचे इतिवृत्त**

**२) या कार्यालयाचे सम क्रमांकाचे परिपत्रक दिनांक २६-२-२००९**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

संदर्भ क्र. १ नुसार अडचणीतील पतसंस्थांमधील कर्ज वसुलीचे अनुषंगाने राज्यस्तरीय कृती समितीच्या दिनांक ५-११-२००७ व दि. ३०-११-२००७ च्या सभेत सविस्तर चर्चा होऊन Matching चे व्यवहार करताना ३०% रोख व ७०% ठेव पावत्या या प्रमाणातच Matching करण्याबाबत अनुमती देण्यात आलेली होती. दरम्यान सदर Matching मध्ये गैरप्रकार होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे संदर्भ क्र. २ नुसार या कार्यालयाने सम क्रमांकाच्या दि. २६-२-२००९ च्या परिपत्रकान्वये Matching रद्द करण्याबाबत निर्देश दिलेले होते.

तथापि कर्ज वसुलीतील अडचणी व कर्जदार-ठेवीदार यांचेकडून Matching सुरू करण्याबाबत होणारी मागणी विचारात घेता, अडचणीतील पतसंस्थांमधील कर्जवसुली करण्याचे अनुषंगाने Matching चे व्यवहार करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

सबब सदरबाबत असे कळविण्यात येते की, Matching चे व्यवहार करताना ३०% रोख व ७०% ठेव पावत्या या प्रमाणातच Matching करण्यात यावे. तसेच Matching चे व्यवहार करताना ज्या ठेवीदारांच्या ठेव पावत्यांचे Matching करावयाचे आहे त्यांचेकडून रु. १००/- च्या स्टँप पेपरवर संबंधीत ठेवीदारांचे हमीपत्र घेण्यात येऊन तो स्वखुशीने सदर ठेव पावत्या कर्जदारास त्यांचे कर्ज खात्यावर वर्ग करण्यासाठी देत असल्याचे व सदर ठेव पावत्यांचे सर्व पैसे त्याला कर्जदाराकडून मिळालेले असून याबाबत त्याची कोणतीही तक्रार नसल्याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे.

वरीलप्रमाणे Matching चे व्यवहार करताना खालील बाबींची दक्षता घेण्यात यावी.

१) ठेव पावत्या दर्शनी किंमतीपेक्षा कमी रकमेस विकत घेण्याच्या अनिष्ट बाबी कुठल्याही परिस्थितीत घडता कामा नयेत.

२) संचालक/संस्थेचे कर्मचारी/प्रशासकांनी वर नमूद केलेल्या अनिष्ठ प्रकारात कुठल्याही प्रकारे सहभागी होऊ नये.

३) Matching चे व्यवहार संस्थेच्या नोंदवह्यामध्ये लेख्यांचे सर्व नियम पाळून पारदर्शीपणे नोंदविले पाहिजेत.

वरीलप्रमाणे व्यवहार करताना यामध्ये कोणतेही गैरप्रकार होणार नाहीत याचीही दक्षता घेण्यात यावी.

स्थळ प्रतिवर मा. सहकार यांची सही असे.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे करिता.**

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पुणे

जा. क्र. ना. बँका/डी-४/पतसंस्था/स्वनिधी/२००९
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : १३ ऑगस्ट २००९

वाचावे – या कार्यालयाचे सम क्रमांकाचे परिपत्रक दिनांक ११ डिसेंबर २००८

# परिपत्रक

या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि. ११ डिसेंबर २००८ चे परिपत्रक रद्द करण्यात येऊन खालीलप्रमाणे सुधारीत परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

राज्यामध्ये सुमारे १८,६२८ नागरी सहकारी पतसंस्था आहेत. बहुसंख्य नागरी सहकारी पतसंस्था या आर्थिक अडचणीत असल्याचे निदर्शनास आले आहे. अडचणीत आलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांची आर्थिक स्थिती विचारात घेता, त्यापैकी अनेक पतसंस्था या त्यांची तरलता संपुष्टात आल्यामुळे आर्थिक अडचणीत येऊन ठेवीदारांच्या ठेवी परत करु शकलेल्या नाहीत.

राज्यातील पतसंस्था अडचणीत येण्याची कारणे विचारात घेता, अनेक पतसंस्थांनी त्यांचे स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी स्विकारलेल्या असल्याने व संस्थांचे स्वनिधी कमी असल्याने संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत ठरुन संस्था अडचणीत येण्याचे हे एक प्रमुख कारण आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ मध्ये मर्यादित जबाबदारी असलेल्या संस्थांनी कर्ज काढण्याच्या बाबतीतील शर्ती नमूद केलेल्या असून, नियम ३६ व ३७ यात उल्लेखिलेल्या संस्थांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मर्यादित जबाबदारी असलेल्या संस्थेने निबंधकाची पूर्वमंजुरी घेतल्याशिवाय आपले भरणा केलेले भाग भांडवल, संचित राखीव निधी आणि इमारत निधी यातून संचित तोट्याच्या रकमा वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमेच्या एकूण १० पटीपेक्षा अधिक होईल इतक्या रकमेची जबाबदारी पत्करता कामा नये अशा प्रकारची स्पष्ट तरतूद आहे. त्यानुसार नागरी पतसंस्थांना त्यांचे स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेच्या ठेवी स्विकारता येणार नाहीत. तसेच नागरी सहकारी पतसंस्थांना लागू केलेल्या आदर्श उपविधीमध्ये देखील या बाबीचा समावेश आहे. पतसंस्थांना अधिक रकमेची जबाबदारी स्विकारावयाची असल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार त्यांनी त्यास संबंधित निबंधकांची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत अनेक पतसंस्थांनी निबंधकांची मंजुरी न घेता, जास्त रकमेची जबाबदारी स्विकारुन नियम ३५ चे सरसकट उल्लंघन केलेले आहे. अधिक रकमेची जबाबदारी स्विकारताना त्याप्रमाणात स्वनिधीची उभारणी केलेली नसल्यामुळे संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत ठरुन आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे. अशा संस्थांवर तात्काळ कार्यवाही केल्यास त्या पतसंस्था आर्थिक अडचणीत येऊन त्यांचे विपरीत परिणाम सहकार चळवळीवर होणार असल्यामुळे अशा संस्थांना त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने त्यांच्या स्वनिधीत वाढ करण्यास कालमर्यादा ठरवून देणे व अशा संस्थांवर काही बंधने घालणे आवश्यक असल्याने याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) राज्यातील ज्या पतसंस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ३५ मधील तरतुदींचे उल्लंघन करून स्वनिधीच्या १० पटीपेक्षा अधिक रकमेची जबाबदारी स्विकारलेली आहे. अशा पतसंस्थांनी या आदेशाच्या दिनांकापासून ५ वर्षांमध्ये त्यांनी स्विकारलेल्या जबाबदारीच्या प्रमाणात त्यांचा स्वनिधी कोणत्याही परिस्थितीत त्यांच्या एकूण ठेवींच्या १०% पर्यंत वाढवावा.

२) अशा पतसंस्थांना नवीन शाखाविस्तार करता येणार नाही.

३) अशा संस्थांनी नवीन ठेवी स्विकारताना त्या फक्त ७% पेक्षा कमी व्याजदराच्याच (Low Cost) ठेवी स्विकाराव्यात ही अट शिथील करण्यात येत आहे.

४) ज्या पतसंस्थांचा स्वनिधी हा १०% पेक्षा कमी आहे अशा पतसंस्थांनी त्यांच्या स्वनिधीचे अस्तित्वातील प्रमाण व १०% पर्यंत स्वनिधी वाढविण्यासाठी दिलेला ५ वर्षांचा कालावधी विचारात घेऊन त्या त्या प्रमाणात स्वनिधी वाढवावा. (उदा. जर संस्थेचा स्वनिधी सद्या ५% असेल तर उर्वरीत ५% स्वनिधी वाढविण्यासाठी ५ वर्षांचा कालावधी लक्षात घेता प्रतिवर्षी १% प्रमाणे स्वनिधीत वाढ करणे आवश्यक आहे. तसेच जर संस्थेचा स्वनिधी सद्या २% असेल तर उर्वरीत ८% वाढविण्यासाठी ५ वर्षांचा कालावधी विचारात घेता प्रतिवर्षी १.६०% प्रमाणे स्वनिधीत वाढ करणे आवश्यक आहे.) ज्या पतसंस्था वरीलप्रमाणे त्या त्या प्रमाणात स्वनिधीत वाढ करणार नाहीत अशा पतसंस्थांना लाभांश वाटप करता येणार नाही.

५) संबंधित तालुका सहाय्यक/उपनिबंधक, जिल्हा उपनिबंधक व विभागीय सहनिबंधक यांनी त्यांचे अधिकार कक्षेत कार्यरत असलेल्या सर्व पतसंस्थांची संस्थानिहाय तपासणी/माहिती घेऊन (राज्यस्तीय सहकारी पतसंस्थांसह) ज्या पतसंस्थांनी नियम ३५ चे उल्लंघन करून अधिक रकमेची जबाबदारी स्विकारलेली आहे अशा पतसंस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये निर्देश देऊन अशा संस्थांचा पाच वर्षाचा कालबद्ध कार्यक्रम आखून त्यानुषंगाने पाठपुरावा करून कोणत्याही परिस्थितीत विहीत कालमर्यादेत नियम ३५ मधील तरतुदींचे पालन होईल असे पहावे. अशा तयार केलेला संस्था निहाय कालबद्ध कार्यक्रमाची नोंदवही संबंधित निबंधकांनी त्यांचे कार्यालयात ठेवावी व दरमहा अशा पतसंस्थांच्या सभेमध्ये याचा आढावा घ्यावा.

६) संबंधित निबंधक यांनी अशा पतसंस्थांचा स्वनिधी वाढविण्याचे अनुषंगाने खालील बाबी संस्थानिहाय कालबद्ध कार्यक्रम तयार करताना विचारात घ्याव्यात.

प्रथमत: संस्थेस स्वनिधी किती रकमेने वाढविणे आवश्यक आहे हे निश्चित करावे व त्यानुषंगाने --

a) संस्थेचे वसूल भाग भांडवल वाढविणे.

b) संस्थेचा नफा वाढविणे (त्यासाठी संस्थेचा सी. डी. रेशो ६०% ते ७०% या दरम्यान राहील यानुषंगाने नियोजन करणे, संस्थेची थकबाकी विचारात घेऊन वसुलीचे नियोजन करणे, संस्थेचे इतर उत्पन्न वाढविणे, संस्थेने केलेल्या गुंतवणुकीचे योग्य व्यवस्थापन करणे वगैरे) अशा पतसंस्थांनी त्यांना होणाऱ्या नफ्यातील जास्तीत जास्त भाग राखीव निधी आणि संशयित आणि बुडीत निधीकडे वर्ग करणे आवश्यक आहे.

c) संस्थेचा प्रशासकीय खर्च (पगार, भाडे, वीज बिल, टेलिफोन बिल इ.) हा कोणत्याही परिस्थितीत खेळत्या भांडवलाच्या २% पेक्षा अधिक होणार नाही या बाबतची दक्षता घेणे.

d) अनावश्यक खर्च, जाहिरात खर्च, सभा समारंभ खर्च पूर्णत: नियंत्रित करणे.

e) संस्थेचा प्रशासकीय खर्च हा कोणत्याही परिस्थितीत खेळत्या भांडवलाच्या २% पेक्षा अधिक होणार नाही या बाबतची दक्षता घेणे.

f) अनावश्यक खर्च, जाहिरात खर्च, समारंभ खर्च पूर्णत: नियंत्रित करणे.

g) सतत तीन वर्षे तोट्यामध्ये असलेल्या शाखा जवळील शाखेत विलीन करणे.

७) सदर कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसांचे आत तयार करून त्याची अंमलबजावणी सुरु करावयाची आहे.

८) संबंधित लेखापरीक्षक यांनी संस्थेचे लेखापरिक्षण करताना संस्थेस दिलेल्या कालबद्ध कार्यक्रमानुसार संस्थेने स्वनिधी वाढविण्यासाठी केलेल्या व करीत असलेल्या उपाययोजनाबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट शेरे नमूद करावेत.

९) अशा पतसंस्थांना ठरवून दिलेल्या विहीत कालमर्यादेत पतसंस्थांनी त्यांच्या स्वनिधित वाढ केलेली नसेल व संस्था नियम ३५ चे उल्लंघन करीत असेल तर सदर संस्थेवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

संबंधित निबंधक/लेखापरीक्षक यांनी त्यांचे विभाग, जिल्हा, तालुक्यामध्ये वरीलप्रमाणे कार्यवाही होईल असे पहावे. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांची राहील याचीही नोंद घ्यावी.

परिपत्रकीय सूचनेप्रमाणे कार्यवाही होत नसल्याचे किंवा नियम ३५ चे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतरही ज्या निबंधक/लेखापरीक्षक यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केलेले आहे असे निदर्शनास आल्यास संबंधित निबंधक/लेखापरीक्षकांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार पुढील शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल याबाबत त्यांनी गंभीरपणे नोंद घ्यावी.

सही/-

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत -

१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) तालुका उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (सर्व)
४) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, पुणे
५) जिल्हा पतसंस्था फेडरेशन

प्रत :

मा. प्रधान सचिव, (सहकार व पणन) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२

**सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता**